बीड (महाराष्ट्र) । सायं.दैनिक । मराठी । वर्ष – ०२ । अंक – ३६५ । वार शुक्रवार दि २६ सप्टेंबर एमएचएमएआर /२०२३/८३९६५ । किंमत ३ रू. । पाने ४

Beed (Maharashtra) Daily Evening Marathi n Year - 02 Issue - 365 Friday 25 September 2025 RNI : MAHMAR/2023/83965 Price - 3 Rupees Pages 4

# उपमुख्यमंत्री अजितदादा व माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे जिल्हा दौऱ्यावर असताना आणि पोलिसांचा तगडा बंदोबस्त असतानाही तरुणाचा खुलेआम खून!

## संतोष देशमुखांना न्याय मिळवण्यासाठी सर्वच राजकीय नेते तुटून पडले, मात्र जिल्ह्यात गेल्या दोन महिन्यात अकरा ते बारा खून झाले, तरी आजवर कुठल्याही नेत्यांनी तोंड उघडले नाही?



सायं.दैनिक महाराष्ट्र

आरंभ

संपादक :– दिपक थोरात मो.९८६०९८५६४

## एसपी नवनीत कॉवत यांच्याकडे प्रशासनाचे प्रचंड अधिकार असूनही गुन्हेगार टोळ्यांवर नियंत्रण ठेवू शकले नाहीत?

### बीड जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेची घडी बसवणारे म्हणून प्रसिद्ध असलेले एसपी नवनीत कॉवत यांचा कायदा व सुव्यवस्थेवरील कंट्रोल कुठेतरी कमी पडतोय का?

**बीड (प्रतिनिधी):– शहरातील मध्यवर्ती व नेहमीच गजबजलेला माने कॉम्प्लेक्स परिसरात व शिवाजीनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत एका तरुणाचा चाकूने भोसकून खून झाल्याने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. यश ढाका असे खून झालेल्या तरूणाचे नाव आहे. ही घटना घडली तेव्हा बीड शहरात उपमुख्यमंत्री अजित पवार व माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांसारखे दिग्गज नेते उपस्थित होते. अशा वेळी प्रचंड बंदोबस्त असूनही रक्तरंजित घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सामान्य जनता थेट पोलीस प्रशासनालाच जबाबदार धरू लागली आहे. कारण बीड जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेची घडी बसवणारे म्हणून प्रसिद्ध असलेले पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्यासारखे खमक्या अधिकारी जिल्ह्यात असतानाही, अशा प्रकारच्या घटना घडतातच कशा? असा संतप्त सवाल नागरिक करत आहेत.**



अलीकडच्या काळात जिल्ह्यात पुन्हा गुन्हेगारी प्रवृत्ती डोके वर काढताना दिसत आहे. गुन्हेगारटोळ्या सक्रिय होत असून सामाजिक सलोखा व शांतता भंग करण्याची धडपड सुरू झाली आहे. त्यामुळे पोलीस अधीक्षकांचा कायदा व सुव्यवस्थेवरील कंट्रोल ढळतो आहे का? असा उद्विग्न प्रश्न आता जनतेतून पुढे येत आहे. शहरातील धाडसी खूनप्रकरणामुळे प्रशासनाच्या कारकीर्दीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, कायदा व सुव्यवस्था कोलमडतेय का, हा प्रश्न आता अधिकच गंभीर स्वरूप धारण करतो आहे.

धक्कादायक बाब म्हणजे ही घटना घडली तेव्हा शहरात उपमुख्यमंत्री अजित पवार व माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांसारख्या दिग्गज नेत्यांची उपस्थिती होती आणि पोलिसांचा तगडा बंदोबस्तही तैनात होता. मग अशा परिस्थितीत खुलेआम खून कसा झाला? हा सवाल आता प्रत्येक नागरिकाच्या ओठांवर आहे. गुन्हेगारांचा धाक संपला आणि पोलिसांचा धाक उडाला का? हा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे. कारण बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्यासारखे कठोर व खमक्या अधिकारी जिल्ह्यात असताना देखील गुन्हेगार टोळ्या बिनधास्तपणे वावरताना दिसत आहेत. गुन्हेगारी टोळ्या सक्रिय होत असून, समाजात तणाव आणि भीतीचं वातावरण जाणवू लागलं आहे. नागरिकांचा आरोप आहे की, प्रशासन नेत्यांच्या दौर्‍याच्या सजावटीत गुंतलं असून, कायदा व सुव्यवस्था सांभाळण्याकडे दुर्लक्ष होत आहे. आजवर जिल्ह्यात शिस्त प्रस्थापित करणाऱ्या पोलीस अधीक्षकांच्या कारकीर्दीवर आता थेट प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. बीडमध्ये गुन्हेगारांचा सुळसुळाट थांबवण्यासाठी पोलिसांनी तात्काळ कठोर कारवाई केली नाही, तर येणाऱ्या काळात संतप्त जनता रस्त्यावर उतरून प्रशासनालाच जाब विचारेल, अशी चिन्हं स्पष्ट दिसत आहेत.

## संतोष देशमुखांना न्याय मिळवण्यासाठी बीड जिल्ह्यातील सर्व नेते तुटून पडले, मग दलितांच्या लेकरांचा जीव स्वस्त आहे का?

**सरपंच संतोष देशमुख यांच्या खुनानंतर संपूर्ण जिल्ह्यातील राजकीय नेते, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांनी आकाशपाताळ एक करत प्रशासनाला जाब विचारला. सर्वांनीच एकमुखाने आवाज उठवत संतोष देशमुख यांना न्याय मिळवून देण्यासाठी पुढाकार घेतला. त्यावेळी नेत्यांच्या सक्रीय हस्तक्षेपामुळे खुनप्रकरणावर लक्ष केंद्रीत झाले. मात्र, याच बीड जिल्ह्यात मागील काही महिन्यांत दलित कुटुंबांच्या लेकरांवर झालेल्या हत्यांच्या घटनांमध्ये मात्र सर्व नेते गप्पच राहिले आहेत. कोणीही प्रशासनाला जाब विचारला नाही, कोणीही न्यायासाठी आवाज उठवला नाही.**

**नागरिकांचा संतप्त सवाल आहे की, सामान्य दलितांच्या लेकरांचा जीव स्वस्त आहे का? सरपंचासाठी संपूर्ण जिल्ह्याचं राजकारण जागं होतं, पण दलितांच्या लेकरांच्या खुनावर मात्र नेते का गप्प बसतात? या दुहेरी भूमिकेमुळे लोकप्रतिनिधींच्या प्रामाणिकपणावर प्रश्नचिन्ह उभं राहिलं आहे. समाजातील सर्वसामान्य घटक न्यायासाठी रडत बसतात, तर प्रभावशाली नेत्यांच्या प्रकरणांत मात्र तत्काळ कारवाई व दखल घेतली जाते. बीड जिल्ह्यातील या अन्याय्य परिस्थितीविरोधात आता संताप व्यक्त केला जात आहे.**

---

### आ.नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्याला यश

## अंबाजोगाईत होणार महावितरणचा नवा उपविभाग कार्यान्वित

अंबाजोगाई (प्रतिनिधी):– तालुक्यातील दीर्घ काळ प्रलंबित मागणी मान्य करत महावितरण कंपनीने अंबाजोगाई उपविभागाचे विभाजन करून नवीन अंबाजोगाई उपविभाग क्र. २ निर्माण करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे तालुक्यातील प्रशासकीय कामकाज अधिक सुलभ होणार असून नागरिकांना थेट फायदा होणार आहे. यासाठी केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा या अनेक दिवसापासून प्रयत्नशील होत्या. 'महावितरण' मुंबईच्या मुख्य नामकरण कार्याल्लायाने दिलेल्या आदेशानुसार अंबाजोगाई ग्रामीण उपविभागाचे विभाजन करण्यात आले आहे. विद्यमान उपविभागाचे अंबाजोगाई उपविभाग क्र. १ असे करण्यात आले असून त्यात अंबाजोगाई शहर शाखा १ आणि २, अंबाजोगाई ग्रामीण शाखा १ आणि दोन, तर नव्या उपविभाग क्र. २ मध्ये पाटोदा, लोखंडी सावरगाव, बर्दापुर,



आ.नमिता मुंदडा यांच्या...

घाटनांदुर आणि उजणी शाखा कार्यालयांचा समावेश करण्यात आला आहे. नव्या उपविभागाच्या आस्थापनेवर एकूण १२ पदे नव्याने निर्माण करण्यात आली आहेत. यात उपकार्यकारी अभियंता (वितरण), कनिष्ठ अभियंता, लिपिक, सहाय्यक लिपिक, शिपाई आदी पदांचा समावेश आहे. या नव्या पदनियुक्तींसाठी वार्षिक खर्च सुमारे १ कोटी २६ लाख ७३ हजार रुपये तर कार्यालय निर्मितीसाठी प्रशासकीय खर्च ९ लाख ८८ हजार रुपये मंजूर करण्यात आले आहेत. या उपविभाग निर्मितीसाठी केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. अंबाजोगाई तालुक्यातील लोकसंख्या, विस्तारित क्षेत्रफळ आणि वाढते प्रशासकीय काम पाहता स्वतंत्र उपविभागाची गरज असल्याचे त्यांनी शासन आणि महावितरण कंपनीसमोर वारंवार मांडले होते. त्यांच्या प्रयत्नांना आता यश आले असून तालुक्यातील नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. या निर्णयामुळे अंबाजोगाई व परिसरातील वीज वितरणाची कामे अधिक वेगाने पार पडतील, शेतकरी आणि नागरिकांच्या तक्रारींचे निवारण तात्काळ होईल, तसेच उपविभागीय पातळीवरील कार्यालयीन दिरंगाई टळणार आहे. याबद्दल आ. नमिता मुंदडा यांनी मुख्यमंत्री तथा उर्जामंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री पंकजाताई मुंडे व उर्जा राज्यमंत्री मेघनाताई साकोरे बोर्डीकर यांचे आभार मानले आहेत.


---

## बीडच्या चार खेळाडूंची महाराष्ट्र अंडर-१६ संभाव्य संघात निवड


### जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या प्रयत्नांना यश

बीड (प्रतिनिधी) दि.२६ : क्रीडा क्षेत्रात नावलौकिक असलेल्या बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या चार खेळाडूंनी आपली छाप पाडत महाराष्ट्र अंडर-१६ संभाव्य संघात स्थान मिळवले आहे. एप्रिल महिन्यात झालेल्या महाराष्ट्र अंडर-१६ निमंत्रितांच्या स्पर्धेत बीड संघाकडून राजन कवठेकर, शौर्य जाधव, कृष्णा बिडवे व कृष्णा गायकवाड यांनी उल्लेखनीय कामगिरी केली होती. त्यांच्या मेहनतीसोबतच









असोसिएशनच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या चौघांची निवड झाली आहे. क्रिकेट हा देशातील सर्वाधिक लोकप्रिय खेळ असून, या स्तरावर प्रचंड स्पर्धा असते. अशा पार्श्वभूमीवर बीडसारख्या जिल्ह्यातून एकाच वेळी चार खेळाडूंची निवड होणे ही मोठी कामगिरी मानली जात आहे. या यशाबद्दल बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. भारत भूषण क्षीरसागर, डॉ. योगेश क्षीरसागर, सचिव डॉ. अमीर सलीम यांच्यासह महेश वाघमारे, ड. राजन साळवी, इरफान कुरेशी, प्रा. जावेद पाशा, मनोज जोगदंड, रिजवान खान, शुभम धूत, संजय उडान, जलील अन्सारी, प्रा. विष्णू सोनवणे, सुनील गोपी शेट्टी, गोपाल गुरखुदे, शेख आरेफ, सरफराज मोमीन, अतिक कुरेशी, अक्षय नरवडे व पठाण शाहरुख यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यास शुभेच्छा दिल्या.

# खोलेश्वर जिनियस इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांची तारांगणास भेट



अंबाजोगाई (प्रतिनिधी) भा.शि.प्र.संस्था संचलित खोलेश्वर जिनियस इंग्लिश स्कूल (सीबीएसई पॅटर्न) च्या विद्यार्थ्यांनी २४ सप्टेंबर बुधवार रोजी बाबासाहेब परांजपे विज्ञान केद्रांस भेट दिली. मराठवाड्यातील सर्वात मोठे आठ मीटर व्यासाचे पहिले तारांगण पाहण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली तारांगणातील आकर्षक दृश्यांद्वारे विश्व, सौरमाला, ग्रह-तारे, उपग्रह तसेच अवकाशातील अद्भुत रहस्ये विद्यार्थ्यांसमोर सजीव झाली. यामुळे विद्यार्थ्यांच्या कुतूहल वृत्तीला चालना मिळाल्याचे सांगितले. इथे विद्यार्थ्यांना विज्ञानातील गुंतागुंतीचे विषय सोप्या भाषेत समजावून सांगितले. हेमंत धानोरकर यांनी स्टॉनॉमी कक्षात विद्यार्थ्यांना जी एस एल व्ही,पी एस एल व्ही रॉकेट्सची माहिती दिली. ऑस्ट्रोहॉल दाखविला. विद्यार्थ्यांना ग्रह,तारे, सूर्यमाला, अवकाश गंगा, राशी, नक्षत्रे, वगैरे वेगवेगळी माहिती यांनी हेमंत धानोरकर यांनी दिली. त्यानंतर, मुख्य तारांगण पाहताना अनिकेत कराड यांनी वेगवेगळ्या तीन गटात, एकूण एकशे तेरा विद्यार्थी व दहा शिक्षकांना खगोलीय माहिती पृथ्वीची उत्पत्ती ग्रह, तारे, सूर्यमाला, अवकाश गंगा, या बद्दल व्हिज्युअल माहिती दाखविली. विद्यार्थ्यांनी विज्ञानाविषयी केवळ सैद्धांतिक माहितीच नाही तर जनु व्हिज्युअल इफेक्ट द्वारे,प्रत्यक्ष अनुभवही घेतला.

# शेतकऱ्यांच्या व्यथांची जाणीव आहे;एका गुंठ्याचा पंचनामा राहणार नाही;जलसंपदा मंत्री राधाकृष्ण पाटील यांची ग्वाही

दौलावडगाव (प्रतिनिधी) अतिवृष्टीमुळे प्रचंड प्रमाणात नुकसान झालेच आहे..परंतु शासन खंबीरपणे आपल्या पाठीशी आहे..शेतकऱ्यांच्या व्यथांची जाणीव आहे..मतदारसंघातील एकही गुंठ्याचा नुकसानीबाबत पंचनामा राहणार नाही..याची आमदार सुरेश धस यांचे साक्षीने ग्वाही देतो ..असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले ..आष्टी तालुक्यातील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी शेतकऱ्यांच्या बांधावर आलेल्या जलसंपदा मंत्री ना राधाकृष्णजी विखे पाटील यांनी अहिल्यानगर आणि बीड जिल्ह्यातील गेल्या आठ दिवसांमध्ये झालेल्या अतिवृष्टी व ढगफुटीमुळे निर्माण झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी आले..असता त्यांनी आमदार सुरेश धस यांच्या समवेत या सर्व नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. आष्टी तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांचे,घरांचे,गावचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, खडकत येथील सीना नदीला पूर आल्याने झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी आमदार सुरेश धस यांनी नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांच्या



व्यथा मंत्री विखे पाटील यांचे समोर आणल्या यावेळी ना.विखे पाटील म्हणाले, मी तुमच्या नुकसानीची पाहणी करण्यासाठीच इथे आलो आहे.मी एक-दोन ठिकाणी जात असलो तरी त्यामुळे संपूर्ण तालुक्यातील यंत्रणा कामाला लागेल. सरकारी यंत्रणेकडून कोणी चुकलं असेल तर आता ते कामाला लागेल.तुमचा रोष असणं साहजिक आहे, कारण ज्याचं जळतं त्याला कळतं.तुम्ही व्यथा मांडत आहात,आणि तुमची चिंता योग्य आहे.मात्र, तुमच्या तालुक्यातील आणि गावातील एकाही गुंठ्याचा पंचनामा राहणार नाही, याची मी हमी देत असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी आमदार सुरेश धस यांनी शेतकऱ्यांना आश्वस्त करत सांगितले की, आष्टी व कर्जत जामखेड तालुक्याच्या हद्दीत असलेल्या मौजे खडकत येथे कोल्हापूर पद्धतीच्या बांधऱ्याचा भराव फूटून शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचा आढावा घेत माहिती दिली.

# जोडणाऱ्या खासबाग-मोमीनपुरा पुलासाठी निधी द्या -मुखीद लाला



बीड (प्रतिनिधी):- अतिवृष्टीच्या अनुषंगाने पाहणी करण्यासाठी जिल्ह्यात आलेले पालकमंत्री, राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित दादा पवार यांची भेट घेऊन बीड नगर परिषदेचे माजी सभापती युवा नेते मुकीत लाला यांनी बीड शहरवासीयांसाठी कळीचा मुद्दा असलेला खासबाग-मोमीनपुरा जोडणारा बिंदुसरा नदीवरील नियोजित पूलाचा प्रश्न मांडला आहे. यामुळे यापूर्वी गेल्या पंचवार्षिक विधानसभेत अजित दादा पवार जलसंपदा मंत्री असताना तत्कालीन तथा विद्यमान आमदार संदीप क्षीरसागर यांनी अनेकदा कागदपत्र घेऊन त्यांच्यासह राष्ट्रवादी पक्षाचे तत्कालीन मंत्री जयंत पाटील यांच्याही सातत्याने भेटीगाठी घेऊन हा पूल निर्माण व्हावा याकरिता पाठपुरावा केला होता. परंतु ती पंचवार्षिक विधानसभा संपून दुसरी सुरू झाली आणि त्यालाही आता जवळपास दुसरे वर्ष सुरू आहे. यावेळी मंत्रिमंडळात अजित पवार हे फक्त

बीड जिल्ह्याचे पालकमंत्रीच नव्हे तर राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री सुद्धा आहेत. तरीही खासबाग-मोमीनपुरा जोडणाऱ्या बिंदुसरा नदीवरील पुलाचे काम काही अजूनही सुरू झालेले नाही. यंदा तर सगळीकडे सातत्याने धुवाधार पाऊस पडत असल्याने बिंदुसरा नदीला सातत्याने दुथडी भरून पूर येत आहेत. दुथडी भरून वाहणाऱ्या बिंदुसरा नदीतून मोठ्या गतीने मोठ्या प्रमाणात पाणी वाहत असल्याने खासबाग-मोमीनपुरा येथे राहणाऱ्यांना तसेच कुरेशी मुहल्ला, ढगे कॉलनी, मोमीनपुरा, बीड मामला, मुहम्मदीया कॉलनी परिसरातील अनेक वसाहती आणि नगरे आदी भागातून शहरात येणाऱ्या नागरिकांना जवळचा असणारा हा मार्ग बंद झाला आहे. शहरात मोठ्या प्रमाणात लोकसंख्या वाढली असून नागरिकांना या जवळच्या मार्गाने ये-जा करणे सोपे होते. यामुळे एक तर लोकांचा वेळ वाचतो तसेच वाहन धारकांचे इंधन वाचते. ऑटो रिक्षाने जाणाऱ्यांना भाडेही कमी लागते मात्र नदीतून पाण्याचा प्रवाह सुरू झाल्यावर हा मार्ग बंद होत असल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागते.

# प्रभुरामचंद्र विद्यालय दादेगावच्या तीन विद्यार्थिनींची विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड




पिंपळा (प्रतिनिधी):- बीड जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झालेल्या पाच विद्यार्थिनींपैकी तीन विद्यार्थिनींची विभागीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली यामध्ये कु.पोटे समृद्धी संतोष.कु.काळे काजल यमाजी.कु.वाघुले विद्या सचिन या विद्यार्थिनींची विभागीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली असून कु.विधाते अनुष्का जालिंदर व कु.विधाते श्रावणी लक्ष्मण या विद्यार्थिनींनी जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक मिळवला आहे.विद्यार्थिनींच्या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.आ.भीमरावजी धोंडे साहेब.युवा नेते.मा.डॉ.अजय दादा धोंडे.अभय राजे धोंडे प्रशासकीय अधिकारी.डॉ.डी.बी राऊत सर.प्रा.शिवदासजी विधाते सर.माऊली बोडखे सर.संजय शेंडे सर.प्रा.नन्नवरे सर.प्रा.वाघुले सर.प्रभूरामचंद्र विद्यालयाच्या वतीने सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.मुख्याध्यापक.श्री.राजाराम नरुटे सर,क्रीडा शिक्षक सुरेश दिंडे सर,सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन करून विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी महायुती सरकार खंबीरपणे उभे-ना. अजित पवार



बीड (प्रतिनिधी) दि.२५ : बीडसह जिल्ह्यात अनेक ठिकाणी अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी महायुती सरकार खंबीरपणे उभे आहे. ज्यांच्या घरात पाणी शिरले अशा नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत व धान्य देण्याचे शासनाने ठरवले आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी दिली.

बीड तालुक्यातील हिंगणी खुर्द येथे गुरुवारी (दि.२५) सकाळी ७ वाजता पूरस्थितीची पाहणी करून अजितदादा पवार यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मागील दोन दिवसांपासून पूरग्रस्त भागाला भेट देऊन शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकल्या होत्या. त्यानंतर त्यांनी सविस्तर माहिती अजितदादांकडे सादर केली होती. त्याअनुषंगाने झालेल्या पाहणी दौऱ्यात त्यांनी शासकीय यंत्रणेला आवश्यक त्या सूचना दिल्या. तसेच, हिंगणी खुर्द गावाचे पुनर्वसन करण्यासंदर्भात चर्चा झाली असून कार्यवाही करण्याचे अजितदादांनी प्रशासनाला निर्देश दिले.

यावेळी आमदार विक्रम काळे, विजयसिंह पंडित, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष ड.राजेश्वर चव्हाण, बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, ज्येष्ठ नेते रमेश आडसकर, युवक जिल्हाध्यक्ष बळीराम गवते, बीडचे तालुकाध्यक्ष ड.राजेंद्र राऊत, भाजपचे ज्येष्ठ नेते विजय पालसिंगणकर, सरपंच संतोष तांदळे यांच्यासह विविध पक्षाचे पदाधिकारी, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधीक्षक नवनीत कावत, मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांच्यासह महसूल, जिल्हा परिषद, कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. पुढे बोलताना अजितदादा पवार म्हणाले की, अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. सरकार गंभीरतेने मदत करण्याच्या प्रयत्नश्न

पान ४ वरून..

**कलेक्टर साहेब, आपली यंत्रणा कोमलवाडी-भोजगावच्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर येऊन कधी पाहाणी करणार?**

शेतकरी थेट प्रशासनाला विचारत आहेत. प्रशासनाने जर तात्काळ हालचाल केली नाही तर संतप्त बळीराजा रस्त्यावर उतरण्याची शक्यता नाकारता येत नाही. सरसकट तात्काळ पंचनामे करून मदत जाहीर करा, गोरगरीबांचे संसार पुन्हा उभा करण्यासाठी ठोस उपाययोजना करा पण प्रशासनाच्या टाळाटाळीमुळे संतापाची लाट उसळली आहे. गोरगरीब शेतकरी आज घरदार, पिकं आणि जमिनी गमावून हवालदिल झाले आहेत. येत्या काही दिवसांत प्रशासनाने गावात येऊन पाहणी केली नाही, तर संतप्त शेतकरी आक्रमक भूमिका घेणार असल्याचे सांगितले.

----------------------

**सरकार आपदग्रस्तांच्या पाठिशी खंबीर उभा आहे**

दिल्या आहेत. सिंदफणा नदीचे पात्र बदलल्यामुळे झालेली हानी लक्षात घेता योग्य त्या ठिकाणी पूर संरक्षण भिंत बांधकामासह इतर उपाय योजना करण्याच्या अनुषंगाने त्यांनी प्रशासनातील संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केल्या. साईकृपा ग्रो इंडस्ट्रीज या कारखान्याचे संचालक बबनराव गवते यांनी ईटकुर येथे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्याकडे दोन लक्ष रुपयांचा धनादेश पूरग्रस्तांच्या मदतीसाठी दिला. त्याचा स्विकार करत ना. पवार यांनी त्यांचे आभार व्यक्त केले.

पूरग्रस्त भागातील दौऱ्यात ना. अजितदादा पवार यांनी विविध निवेदने स्विकारली. यावेळी गेवराई विधानसभा मतदार संघाचे आमदार विजयसिंह पंडित, जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन माजी आमदार अमरसिंह पंडित आणि औरंगाबाद शिक्षक मतदार संघाचे आमदार विक्रम काळे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेखे मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहेमान यांच्यासह प्रशासकीय अधिकारी आणि पदाधिकारी व पूरग्रस्त भागातील शेतकरी, नागरीक, ग्रामस्थ व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

--------------------

**अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे आयुष्य उध्वस्त झाले**

आहे. सरकारने शेतकऱ्यांना पंचनाम्याच्या प्रक्रियेत अडकवून अधिक मानसिक छळ देण्यापेक्षा सरसकट नुकसान भरपाई द्यावी. आज शेतकरी संकटात आहे. सरकारने केवळ घोषणा न करता तातडीने निर्णय घ्यावा आणि शेतकऱ्यांना न्याय द्यावा, कारण शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी करण्याची हीच योग्य वेळ असल्याचे जयंत पाटील यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

शेतकऱ्यांना एकरी किमान ५० हजार रुपयांची मदत तातडीने द्यावी

अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. काही दिवसांपासून सुरु असलेल्या अतिवृष्टीने शेतकरी हवालदिल झाला आहे. त्यामुळे एकरी किमान ५० हजार रुपये इतकी थेट मदत तातडीने दिली पाहिजे. सरकारने हप्ते पडून २५ हजार रुपयांचा पहिला हप्ता दिला पाहिजे.

गायी म्हशी साठी ६० ते ७० हजारांची तर शेळ्या मेंढ्या साठी १० हजारांची नुकसान भरपाई द्या

अतिवृष्टीमुळे शेतीसह जनावरांचे देखील मोठे नुकसान झाले आहे. मोठ्या प्रमाणात जनावरे वाहून गेली आहे. जनावरांच्या किंमती वाढलेल्या आहेत. बाजारात सध्या ०१ लाख २० हजार पर्यंत गायी म्हशींची किंमत आहे. सरकारने किमान ६० ते ७० हजार रुपये गायी म्हशीं ज्या वाहून गेल्या आहेत त्याची नुकसान भरपाई द्यावी, शेळ्या मेंढ्या साठी १० हजार रुपये द्यावेत.

ज्यांच्या जमिनी खरडून वाहून गेल्या त्यांना एकरी ३० हजार मदत द्या

अनेक भागात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या जमिनी वाहून गेल्या आहेत. जमिनी खरडून गेल्या आहेत. त्यांना शासनाने एकरी ३० हजार रुपयांची मदत द्यावी. यासोबतच नदी पात्रालगत संरक्षण भिंत बांधून द्यावी अशी मागणी आ. जयंत पाटील यांनी केली आहे.

-=-------------------

**चुकीच्या पध्दतीने नदीवरील बंधाऱ्याची उंची वाढवल्याने नदी काठच्या शेत जमिनींचे नुकसान**

सदर बंधाऱ्याने पाणी अडवल्यामुळे नदीच्या पाण्याचा प्रवाह लगतच्या जमिनीतून वाहू लागला आहे. नदीने पात्र बदलल्याने शेती वीस फुट खोलीने वाहून गेली आहे. पाण्याचा प्रवाह असाच राहिल्यास माझ्या व माझ्या कूटूंबियांच्या सव्र्हे नं. १७ मधील शेतीलाही धोका निर्माण झाल्याचे शेतकरी खेडकर यांनी म्हटले आहे. याबाबत त्यांनी पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंत्याकडे तक्रार केली आहे.

----------------------

**अतिवृष्टीमुळे शेतकरी आणि गायरान धारकांचे मोठे नुकसान, तातडीने मदतीची मागणी**

तातडीने पंचनामे करून शेतकरी आणि गायरान धारकांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी मानवी हक्क अभियान सो मीडिया जिल्हा अध्यक्ष आदर्श मुजमुले यांनी केली आहे. तसेच, पीक विम्याची रक्कमही लवकरात लवकर शेतकऱ्यां सह गायरान धारकांच्या खात्यात जमा करावी, अशी मागणी मानवी हक्क अभियान संघटनेच्या वतीने होत आहे

--------------------

**धारूर तालुक्यात ९० टक्के घरकुलाचे बांधकामेच झाले नाहीत**

पूर्ण व्हावे यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान घरकुल योजना आणली या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना एक लाख ८० हजाराचे अनुदान दिले जाते यामुळे अनेक सामान्य नागरिकांच घराचे स्वप्न पूर्ण झाले आहे मात्र या योजनेच्या आडून काही संधी साधू सरकारी अधिकारी आणि कर्मचारी यातून आपला खिसा भरता येईल यासाठी प्रयत्न करीत आहेत आणि बऱ्याच प्रमाणात त्या सरकारी भ्रष्टाचारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे प्रयत्न यशस्वी देखील झाले असल्याचे धारूर पंचायत समिती अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या प्रधानमंत्री घरकुल योजनेतून दिसून येत आहे धारूर पंचायत समिती अंतर्गत मागील दोन वर्षांमध्ये जवळपास दहा हजार घरकुलांना मंजुरी देण्यात आलेली आहे मात्र यातील केवळ दहा टक्के लाभार्थ्यांनी खऱ्या अर्थाने घराचे बांधकाम करून पंतप्रधान घरकुल योजनेचे उद्दिष्ट पूर्ण केली आहे मात्र ९०% लाभार्थ्यांनी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सांगण्यावरून घराला कसलीही एक वीट लावलेली नाही प कोणाच्यातरी घराचे जिओ ट्यागचे फोटो पंचायत समिती कार्यालयातच बसून फाईलीला जोडून संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यात पैसे टाकण्याचे काम या भ्रष्ट कर्मचाऱ्याकडून अधिकाऱ्यांच्या पाठबळावर करण्यात आले आहे त्यामुळे पंतप्रधान घरकुल योजनेमध्ये धारूर पंचायत समितीत मोठा भ्रष्टाचार झालेला आहे यासंदर्भात माध्यमातून बातम्या देखील प्रकाशित झालेल्या असताना गटविकास अधिकारी या संदर्भात कसलीही चौकशी न करता घरकुल योजनेअंतर्गत बांधकाम नाही झाले असे एखाद घर दाखवा असा प्रश्न उपस्थित करीत घरकुल विभागातील कर्मचाऱ्यांच पाठ राखण करण्याचे काम करीत आहेत खरोखरच घरकुल विभागाअंतर्गत संबंधित कर्मचाऱ्यांनी लाभार्थ्याकडून घरे बांधकाम करून घेतले आहे तर मग गटविकास अधिकारी वैजनाथ लोखंडे हे प्रत्येक गावात जाऊन लाभार्थ्यांच्या घरांचा पंचनामा करण्याचे धाडस दाखवतील का असा प्रश्न घरकुल विभागातील भ्रष्टाचाराच्या अनुषंगाने नागरिक उपस्थित करीत आहेत तसेच धारूर पंचायत समिती अंतर्गत सुरू असलेल्या घरकुल योजनेची वरिष्ठ स्तरावरून सखोल चौकशी करण्याची मागणी देखील नागरिक करत आहेत.

ैसे मिळणार नाहीत म्हणून इंजिनियर्सनी लाभार्थ्यांना घरे बांधू दिली नाहीत

धारूर तालुक्यात घरकुल योजनेअंतर्गत लाभ मिळाल्या लाभार्थ्यांनी खरोखर घराचे बांधकाम केले असते तर घरकुल विभागातील कर्मचाऱ्यांना याचा फायदा झाला नसता म्हणून धारूर पंचायत समितीतील कंत्राटी पद्धतीने नेमलेल्या इंजिनियर्सनी एक लाख ८० हजारात घरकुल होत असते का तुमचा भरपूर खर्चा होईल तुम्ही घर बांधण्याचा नादात पडू नका असे म्हणत घर बांधकाम करायचे असताना देखील लाभार्थ्यांचे मन परिवर्तन करून घर बांधू दिली नाहीत आम्हाला पैसे द्या आम्ही तुम्हाला घर बांधकाम न करता घरकुलाचे हप्ते तुमच्या खात्यावर जमा करून देतो असे म्हणून घरकुल विभागातील इंजिनियर्सनी लाभार्थ्यांना घरे बांधू दिली नाहीत त्यामुळे पंतप्रधान घरकुल योजनेतील घरे उभा राहू शकली नाहीत परिणामी मोठा भ्रष्टाचार या योजनेत झाला आहे.

--------------------

**बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातील विद्यार्थ्यांचे यावर्षीचे संपुर्ण शैक्षणिक शुल्क माफ करा -तांगडे**

झालं आहे. शेतात सोयाबीन, बाजरी, तुरसह अन्य खरीप पिके हि पाण्याखाली नेस्ताभूत झाली आहेत. यामुळे शेतकरी राजा आर्थिक कचाट्यात सापडला आहे. इतर नुकसान देखील प्रचंड मोठ्या प्रमाणात आहे. फक्त मदत देऊनच हे नुकसान भरून येईल असे नाही. तर या ठिकाणच्या नागरिकांचे मनोबल देखील खचले आहे. सरकारकडून मदतीची अपेक्षा असून प्रशासनाकडून पंचनामा करण्याचे ढोंग सध्या तरी दिसून येत आहे. हे काम पूर्ण झाल्या नंतरच मदत मिळेल तेव्हा मिळेल. परंतु सध्या बीड जिल्ह्यासह मराठवाडा आणि अन्य जिल्ह्यात ज्या ठिकाणी प्रचंड पाऊस झाला आहे. त्या ठिकाणचे विद्यार्थी स्व-बाहेर जिल्ह्यात हालाखीच्या परिस्थितीत शिक्षण घेत आहेत. शिक्षणाची फीस कशी आणि कुठून भरावी ? असा गंभीर प्रश्न सध्या तरी पालकांपुढे उभा असून सरकारने मदत होईल तेव्हा होईल परंतु शिक्षण घेत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे यावर्षीचे इयत्ता दहावी व बारावी स्टेट बोर्डासह व्यवसायिक शिक्षणासोबत, पदवी व पदव्युत्तर अन्य सर्व शिक्षणाचे शैक्षणिक शुल्क सरकारने निस्वार्थपणे माफ करून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावावा तसेच राज्य सरकारमधील मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह संपूर्ण मंत्रिमंडळ व दोन्ही सभागृहातील आजी-माजी आमदार, लोकप्रतिनिधीं तसेच केंद्र सरकारमधील राज्यातील मंत्री व आजी-माजी खासदार लोकप्रतिनिधींचे तीन महिन्यांचे वेतन सरकारने कपात करून हा पूरग्रस्त व शेतकरी राजाच्या उभारणीसाठी या निधीचा वापर करावा. व या लोकप्रतिनिधींनी देखील मनाचा मोठेपणा दाखवत तीन महिन्याचे वेतन नाकारावे हीच खरी समाज व देशसेवा ठरेल. अशी मागणी वडवणी येथील पत्रकार भैय्यासाहेब तांगडे यांनी केली आहे. तर शैक्षणिक शुल्क माफ करावे या मागणीचे निवेदन ईमेलद्वारे राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे व ना. अजित पवार, बीडचे जिल्हाधिकारी यांना पाठविले आहे.

-------------------------

**राष्ट्रीय महामार्ग ६१ खेर्डा खुर्द जोड रस्त्याची दुरावस्था नागरिक त्रस्त**

असल्यामुळे पूर्णपणे उध्वस्त झालेला आहे त्यामुळे येथील तांड्या वस्ती वरील व शेतकरी यांच्यासाठी उपयुक्त असणाऱ्या रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली असून यामध्ये होणाऱ्या सततच्या पावसामुळे मोठे खड्डे आणि पाणी साचलेलं असल्यामुळे याणे जाने करण्यासाठी मोठी अडचण होत आहे त्यामुळे तेथील नागरिकांना आरोग्य, शिक्षणना सह दळण वळण विस्कळीत होत आहे म्हणून या रोजच्या होत असल्याल्या त्रासा मुळे येथीन नागरिकांनेहा रस्ता तात्काळ दुरुस्ती करण्यात येवा या मागणीच निवेदन उपअभियंता बांधकाम विभाग माजलगाव, तहसील कार्यालय माजलगाव, गटविकास अधिकारी पंचायत समिती माजलागाव, सह ग्रामीण पोलीस स्टेशन माजलगावं यांना देण्यात आले असून यात जर सबंधीत कार्यालय यांना तात्काळ लक्ष न दिल्यास या पेक्षा ही मोठं उपोषण करू असा ईशरा येथील नागरिकांना दिला

-----------------------

**धोंडराई घरकुलवासीयांची घरपट्टी माफ;सरपंच**


अतोनात नुकसान झाले आहे. बीड जिल्ह्यात बऱ्याच ठिकाणी काहींचे घरे वाहून गेले आहेत अतिशय महाभयंकर शेतकऱ्यावर संकट कोसळले असता या सर्व गोष्टीची जाणीव करून धोंडराई गावातील जनतेची आर्थिक परिस्थीती ओल्या दुष्काळामुळे हलाखीची बनली आहे. तसेच आर्थिक कारणाने यामुळे ग्रामीण भागातील जनतेला दिलासा देण्यासाठी धोंडराई ग्रामपंचायतींची थकित घरपट्टी व सरसकट माफ करत सर्व लाभार्थी कर धारकांना परत देण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला आहे.बीड जिल्ह्यासह गेवराई तालुक्यात मोठ्या प्रमाणात पिकांचे मोठे नुकसान होऊन शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती बिकट झाली आहे. गेवराई तालुक्यातील संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्था कोलमडून पडली आहे. शेतमजूर व अन्य गावकऱ्यांचीही आर्थिक स्थिती हलाखीची झाली आहे. परिणामतः अनेकांना धोंडराई ग्रामपंचायतीच्या घरपट्टीचा व भरणा घरकुलधारक लाभार्थ्यांनी केला असता, सध्या स्थितीला असलेली थकबाकी वसुलीची कारवाई अन्यायकारक आहे. शेतकऱ्यावरील संकटामुळे एक वर्षाची घरपट्टी पूर्णपणे माफ राहील अशी कौतुक करणारी घोषणा कर्तव्यदक्ष सरपंच शितल अशोकराव साखरे यांनी घोषणा केल्याने गावकऱ्यांकडून या निर्णयाचे स्वागत होत आहे घरपट्टी आणि कर माफ करण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला आहे. असे विद्यमान सरपंच शितल साखरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे

--------------------

**दलित कुटुंबाला त्यांच्या हक्कांपासून डावलणाऱ्या भुमाफियांवर गुन्हे दाखल करा**

जिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, मौ.चतुरवाडी (ता.अंबाजोगाई) येथील जुना सर्वे नं.४९६ नवीन सर्वे नं.१७/१ मधील ९ एकर ०८ गुंठे जमीनीचा हैद्राबाद कुळ कायदा १९५० चे कलम ई (१) प्रमाणे ताबा मिळणेची कार्यवाही तहसीलदार, अंबाजोगाई यांच्याकडून सुरू झाल्यामुळे अंबाजागाई येथील भुमाफिया असलेल्या एका डेव्हलपर्स यांच्याकडून जमीनीचे खोटे दस्ताऐवज बनवून व सदर जमीनीवर बेकायदेशीररित्या ले-आऊट व एन.ए. प्रक्रिया सुरू करून या सर्वे नंबर मध्ये व जुना स.नं.४९७ व नवीन स.नं.१८ मध्ये प्लॉट विक्री करीत आहेत व लोकांची फसवणुक करीत आहे. तसेच येथील भुमाफिया सदर जमीनीचा वाद विनाकारण जातीय द्वेषातून कट कारस्थान करून सदर जमीन हडपण्याचा डाव आखत आहेत. तसेच इतर ही भुमाफिया अंबाजोगाई शहराच्या आसपास अवैधरित्या गुंडांकरवी दबाव टाकून जमीनी बळकाविण्याचे अनेक उदाहरणे समोर आलेली आहेत. प्रामुख्याने काही जण डेव्हलपर्सच्या माध्यमातून अनेक जमीनींवर कब्जा सुरू आहे. तसेच बीड येथील एका डेव्हलपर्स कडुन जयभिमनगर मधील सम्राट नगर मध्ये सुध्दा अनेक लोकांना इसार पावती करून दलित समाजाच्या अनेकांची फसवणूक करण्यात आली आहे. यामध्ये बीड येथील संबंधित डेव्हलपर्स व अंबाजोगाई येथील एकाने शेकडो प्लॉटमध्ये घोटाळा केला आहे. तसेच लातूर रोडवर असलेल्या एका नामांकित पार्क मध्ये तर जोगाईवाडी पाझर तलावातील नैसर्गिक पाण्याचा स्रोत बुजवून त्याठिकाणी प्लॉट तयार केलेले आहेत. तसेच जोगाईवाडी पाझर तलावामध्ये प्लॉटिंग पाडली आहे. यामुळे तलावाची साठवण क्षमता कमी झालेली आहे. सदर भाग हा ग्रीन झोन म्हणून शासनाने घोषित केलेला आहे. याची सर्व सखोल चौकशी करून अनाधिकृत प्लॉटींग नोंदणी रद्द तसेच ताबा काढून जोगाईवाडी पाझर तलाव हा मोकळा करण्यात यावा. पाटबंधारे विभाग याकडे सोयिस्कर डोळेझाक करून अनाधिकृत भुमाफियांना एकप्रकारे अभय देत आहेत, त्यावरही कठोर कार्यवाही करावी, तसेच जोगाईवाडी पाझर तलावामध्ये कॅचमेंट एरिया मध्ये अनाधिकृत ताबा केल्यामुळे जोगाईवाडी पाझर तलावातील साठवण क्षमता कमी झाल्यामुळे या पावसाळ्यात तलावामध्ये पाणी साठवण न होता पूर्ण अंबाजोगाईतील अनेक कॉलनीमध्ये तलावाचे पाणी शिरलेले आहे. त्यामुळे इमारती ढासळण्याचा धोका उद्भवून प्रचंड हानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तरी यासंदर्भात पाटबंधारे विभागातील दोषी अधिकाऱ्यांवर व अनाधिकृत जमीनी बळकाविणाऱ्यांविरूध्द कठोर कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी लोकजनशक्ती पार्टी (रा) युवाचे मराठवाडा प्रदेशाध्यक्ष राजेश वाहुळे यांनी गुरूवारी अप्पर जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. निवेदनावर लोकजनशक्ती पार्टी (रा) युवाचे विविध पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# चतुर्थ माळीच्या निमित्ताने बीड जिल्ह्यातील शहरातील सर्व भाविक भक्तांची मोठी गर्दी महिला पोलीस कर्मचाऱ्यांनी आपले प्रशासकीय पोलीस कर्तव्य बजावून घेतली महिलांच्या सुरक्षेतेचे काळजी



बीड (प्रतिनिधी):- बीड जिल्ह्याचे ग्रामदैवत असलेले श्री माता खंडेश्वरी देवी या ठिकाणी दिवसान दिवस भावी भक्तांची दर्शनासाठी गर्दी होत आहे याच पार्श्वभूमीवर आज चौथी माळ असल्यामुळे कारण श्री अंबाबाईच्या देवीच्या नवरात्री मधल्या आरती मध्ये सांगितले आहे की चतुर्थीच्या दिवशी विश्व व्यापक जननी हो उपासकापाशी आंबे प्रसन्न अंत करणी हो या नियमाप्रमाणे सर्व भाविक भक्तांकडे श्री जगदंबा अंबाबाई आज प्रसन्नतेने पाहत असल्यामुळे बीड जिल्ह्यातील व बीड शहरातील सर्व भाविक भक्त मोठ्या प्रमाणावर श्री खंडेश्वरी देवीच्या दर्शनासाठी उपस्थित होते महिला भाविक भक्त मोठ्या संख्येने होत्या या महिलाच्या सुरक्षेची काळजी घेण्यासाठी बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावन साहेब यांनी विशेष पोलीस मुख्यालयातील महिला कर्मचाऱ्यांची खंडेश्वरी देवी मंदिर परिसरामध्ये सर्व महिलांची काळजी घेण्यासाठी खास करून येथे नियुक्ती केलेली आहे महिला पोलीस कर्मचारी अत्यंत उत्कृष्टपणे आपले पोलीस प्रशासकीय कर्तव्य बजावत असून सर्व या ठिकाणी येणाऱ्या महिला भाविक भक्तांना चांगल्या प्रकारे माणुसकीच्या नात्याने गोड प्रेमाने बोलून व्यवस्थित रांगेमध्ये उभा करून देवीचे दर्शन कसे लवकरात लवकर उपलब्ध करून देता येईल याच्यासाठी त्या प्रयत्नशील आहेत तसेच खंडेश्वरी देवी मंदिर ट्रस्टीच्यावतीने देखील चांगल्या प्रकारे व्यवस्था मंदिर परिसरामध्ये केलेली आहेत आकर्षण विद्युत रोषणाई असे विविध त्या ठिकाणी आकर्षित दिवे लावलेले आहेत जेणेकरून सर्वांच्या आकर्षण करणारे असे खंडेश्वरी देवी मंदिर परिसर बनले आहे महाराष्ट्रातून भाविक भक्त आता खंडेश्वरी देवीचे दर्शनासाठी हळूहळू येत असल्याचेही या ठिकाणी दिसून येत आहे काही भाविक भक्तांना विचारले असता काही भाविक भक्त सांगतात आम्ही नंदुरबार वरून आलोत संभाजीनगर मधून तसेच कोणी सांगतात परभणी नांदेड मधून आलोत कोणी धाराशिव सोलापूर सांगली कोल्हापूर अशा महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून देखील आता भाविक भक्त सर्वांच्या भाविक भक्तांच्या नवसाला पावणाऱ्या श्री खंडेश्वरी मातेच्या दर्शनासाठी येत आहेत ही बीड जिल्ह्यासाठी कौतुकास्पद बाब आहे म्हणून या ठिकाणी चोख पोलीस बंदोबस्त जिल्हा पोलीस दलाच्या वतीने ठेवण्यात आलेला आहे विशेष म्हणजे बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कौल साहेब यांच्या आदेशावरून तसेच अप्पर पोलीस सचिन अधीक्षक पांडकर साहेब व डीवायएसपी बीड यांच्या मार्गदर्शनाखाली हा बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे तसेच पेठ बीड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व पोलीस कर्मचारी या पेठ बीड पोलीस स्टेशनचे पोलीस मुख्यालयातील महिला कर्मचारी कांचन बहिरवाळ तसेच पोलीस कर्मचारी प्रिया मॅडम तसेच पोलीस कर्मचारी माधुरी मॅडम तसेच जावळे मॅडम होमगार्ड कर्मचारी तसेच मंदिर गाभाऱ्यामध्ये सर्व भाविक भक्तांना महिला व भक्तांना व्यवस्थित दर्शन होण्यासाठी आपले कर्तव्य बजावत असलेल्या सामाजिक कार्यकर्त्या नयना भाकरे पाटील व त्यांच्या सहकारी मैत्रीण या महिला पोलीस कर्मचाऱ्यांना सहकार्य करून आपली.

## तालुक्यातील अतिवृष्टी पुर बाधित कुटुंबांना धनंजय मुंडे याच्या हस्ते किरण कटचे वाटप



परळी (प्रतिनिधी):- परळी तालुक्यातील गोदावरी व तालुक्यातील इतर लघु नद्यांना दिनांक २२ २३ व २४ सप्टेंबर २०२५, रोजी झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे व अनेक घरात पाणी जाऊन कुटुंबाचे बाधित झाली होती. पण आज पासून उतरत आहे. सतत गोदावरी पुराचे पाणी पातळी वाढत राहिल्यामुळे पुन्हा पोहनेर २५२ तेलस्मुक ७१ बोरखेड २६ ममदापूर ०३ या गावातील सकल भागातील घरात पाणी जाऊन ३५२ कुटुंब बाधित झाले आहेत. आज दिवसभरात बाधित कुटुंब यांना प्रत्येकी दहा किलो व दहा किलो तांदूळ माननीय आमदार धनंजय मुंडे, यांच्या हस्ते धान्य वितरित केले. तसेच ममदापूर येथील पुरात मयत शिवराज कदम यांचे कुटुंबास भेट देऊन शासकीय मदत दिली. यावेळी अरविंद लाटकर, उपविभागीय अधिकारी परळी वेंकटेश मुंडे. तहसीलदार परळी. तलाठी, ग्रामसेवक, मंडळ अधिकारी, सरपंच व पदाधिकारी शेतकरी हजर होते. यावेळी पीक नुस्कान पाहणे देखील केली.५०००/ प्रती कुटुंब मदतीकरता सर्वांना आधार व बँक पासबुक जमा करण्यास सूचना केली.सदरील मदत उद्यापासून ऑनलॉइन जमा करण्यात येणार आहे.अंतिम अहवाल आज रात्री उशिरा मिळेल परंतु आजचे पंचनामे अहवालानुसार सदरील कुटुंबाची संख्या जवळपास ३०० पेक्षा जास्त होणार आहे. अंतिम अहवाल प्राप्त झाल्याच्या नंतर सुधारित माहिती अवगत करण्यात येईल अशी माहिती तहसीलदार परळी वैजनाथ श्री वेंकटेश मुंडे. यांनी दिली.

## सिरसाळ्यातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात बेशिस्त मोटरसायकल पार्किंग वाल्या विरोधात कारवाई करा असी सामान्य नागरिकांची मागणी



सिरसाळा (प्रतिनिधी):- सिरसाळ्यातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात दिवसा परिसरातील बीड परळी महामार्गावर व पाथरी मोहा या मेन डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथील रोडवरील मोठी अडचण निर्माण करीत आहे.या प्रमुख रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात बेशिस्तपणे वाहाणे पार्किंग केली जातात.बेशिस्तपणे पार्किंग करण्याऱ्यामुळे शहरातील ईतर सर्व सामान्य नागरिकांना वाहतूक कोंडीची सामना करवा लागतो.हि बांब सिरसाळा पोलीस वाहतुक विभागाच्या निर्दशनास आनुन देत या बेशिस्त पणे पार्कींग वाहनावर कडक कारवाई करण्यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते. बापु शिंदे यांनी। असे आव्हान दिले आहे.येथिल वाहतुक विभागाने यांची तात्काळ दखल घेऊन सिरसाळा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात होणारी बेशिस्त मोटरसायकल वाहान पार्किंग विरोधात कारवाई हाती घ्यावी असे या मुळे येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात ऑक्सीडेंट होण्याचे यामुळे जास्तीत जास्त चान्सेस दिसतात येत आहेत.तरी सिरसाळा पोलीस वाहतुक विभागाने लक्ष घालून यावर प्रतिबंधक कारवाई करावी. या बीड परळी महामार्गावर मोकळा राहील व डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात बेशिस्त वाहतूक सुरळीत करण्यात यावी.व कायदेशीर कारवाई करण्यात यावी असी मागणी होत आहे.

## ऐन सणासुदीच्या दिवसात नळाला पंधरा दिवसापासून पाणी नाही



धारूर (प्रतिनिधी):- धारूर शहरात गेल्या पंधरा दिवसापासून नळाचा पाणिपुरवठा बंद असून नागरिकांचे भर पावसाळ्यात पाण्यासाठी हाल होत आहेत. दसरा सण हा हिंदू साठी महत्वाचा सण माणला जातो. घरातील वस्तू न वस्तू स्वच्छ केली जाते. घर धुणे, कपडे धुणे तसेच पुर्ण भांडी धुणे ही कामे माता भगिनींना करावी लागतात. अश्या सणासुदीच्या दिवसात नगरपरिषदेचे पाणिपुरवठ्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. सध्या पडणाऱ्या पावसाचे पाणी टाक्या लावून पाणि साठवले जात असून त्यावरच पाण्याची गरज भागवली जात असल्याचे चित्र धारूर मध्ये दिसत आहे. ऐन भर पावसाळ्यात नगरपरिषदेच्या अश्या ढिल्या कारभारावर नागरिकांतून संताप व्यक्त होत आहे. किमान सणासाठी तिन दिवसातून एकदातरी तरी पाणिपुरवठा करण्यात यावा अशी मागणी धारूरकर करत आहेत.

## जन ग्रामीण पत्रकार संघाचा नागपूर येथे त्र्यंबकेश्वर (नाशिक) येथे पत्रकारावर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ मोर्चा



दौलावडगाव (प्रतिनिधी):- जन ग्रामीण पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष शैलेंद्र साळे प्रदेशाध्यक्ष देवानंद अहिरे राज्य कार्याध्यक्ष युवराज देवरे राज्य उपाध्यक्ष धर्मेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जन ग्रामीण पत्रकार संघ, नागपूर यांच्या वतीने दिनांक २५ सप्टेंबर २०२५ रोजी संविधान चौक, नागपूर येथे भव्य निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले. या मोर्चात संघाचे पदाधिकारी, सदस्य तसेच पत्रकार बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मोर्चाचे नेतृत्व विदर्भ समन्वयक सुरजितसिंग बाठ, विदर्भ विभागीय अध्यक्ष प्रतीक पांडे, विदर्भ विभागीय सचिव सचिन बैस, नागपूर जिल्हाध्यक्ष संजय तिवारी, नागपूर महिला अध्यक्ष शितल नंदनवार, तसेच उपाध्यक्ष अजहर पटेल, महिला सचिव प्राजक्ता चक्रवर्ती, महिला उपाध्यक्ष सीमा ठाकूर, नागपूर शहर सचिव राजेश शुक्ला यांनी केले. यावेळी संघाच्या पदाधिकारी व सदस्यांनी पत्रकारांच्या प्रश्नांबाबत शासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी संविधान चौकात एकत्र येऊन ठाम भूमिका मांडली. मोर्चात बोलताना संघाचे विदर्भ समन्वयक सुरजितसिंग बाठ यांनी सांगितले की, पत्रकारांच्या सुरक्षेसाठी आणि हक्कांसाठी शासनाने ठोस कायदे करणे अत्यावश्यक आहे. ग्रामीण भागातील पत्रकारांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात आमचा संघर्ष सुरू राहील. अध्यक्ष प्रतीक पांडे यांनी स्पष्ट केले की, पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. मात्र ग्रामीण भागातील पत्रकारांना भेडसावणाऱ्या समस्या गंभीर असून शासनाने त्वरित त्या सोडवाव्यात. विदर्भ विभागीय सचिव सचिन बैस यांनी मोर्चादरम्यान व्यक्त केले की, पत्रकारांवर होणारे हल्ले थांबले पाहिजेत. शासनाने पत्रकार संरक्षण कायद्यात थोडे बदल करून पत्रकारांवर हल्ले करणाऱ्या हल्लेखोरांवर कठोरात कठोर कशी कारवाई करता येईल यासंदर्भात त्याच्यात बदल करावे. तसेच नागपूर जिल्हाध्यक्ष संजय तिवारी यांनी सांगितले की, ग्रामीण पत्रकार हे खऱ्या अर्थाने समाजाचे आरसे आहेत. त्यांची उपेक्षा होऊ नये म्हणून आमचा हा मोर्चा आहे. महिला पत्रकारांच्या प्रश्नांवर भाष्य करताना शितल नंदनवार यांनी सांगितले की, ग्रामीण महिला पत्रकारांना काम करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी संघ कटिबद्ध आहे. मोर्चात उपस्थित सर्व पदाधिकारी व सदस्यांनी शासनाकडे त्र्यंबकेश्वर येथे पत्रकारावर झालेल्या हल्ल्याच्या हल्लेखोरांवर कठोरात कठोर कारवाई व्हावी या मागण्यांचे निवेदन सादर केले. उपस्थितीमुळे संविधान चौक परिसर घोषणाबाजीने दुमदुमून गेला होता.

विध्यार्थ्यांच्या जडण घडणीमध्ये राष्ट्रीय सेवा योजना महत्वाची भूमिका निभावते-डॉ.कदम

## चौसाळा महाविद्यायालयात रा.से.यो.दिन साजरा



चौसाळा (प्रतिनिधी ):- कला व विज्ञान महाविध्यालयामध्ये २४ सप्टेंबर हा दिवस राष्ट्रीय सेवा योजना दिवस म्हणून साजरा करण्यात आला या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.पंडित खाकरे,पदयुत्तर संचालक डॉ.सुधाकर वणवे व कार्यक्रमाधिकारी डॉ.अमर आलदे,डॉ.सय्यद शानूर,डॉ.संजय कदम व्यासपीठावर उपस्थित होते. या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते महात्मा गांधी व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.रा.से.यो. च्या वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. या वेळी प्रमुख मार्गदर्शक करताना कार्यक्रमाधिकारी तथा क्रीडा संचालक डॉ.संजय कदम यांनी रा.से.यो. स्थापना दिवसाचे महत्व विषद करून विध्यार्थ्यांचे स्वतः पुरता विचार न करता स्वावलंबी बनून राष्ट्राची सेवा करावी.मी समाजाचा काही देण लागत असून सामुहिक जबाबदारी स्वीकारून श्रमदान हे श्रेष्ट्दान असून आपत्ती व्यवस्थापनामध्ये समाजाला मदत करावी.एक सुसंकृत नागरिक बनण्यासाठी रा.से.यो. महत्वाची भूमिका बजावत असल्याचे नमूद केले.प्रास्ताविक डॉ. शानूर सय्यद तर सूत्र संचालन डॉ.आलदे यांनी केले. यावेळी विद्यार्थी,प्राध्यापक मोठ्या संखेने उपस्थित होते. आदर्श शिक्षकांचा प्राचार्य डॉ. खाकरे यांनी पुष्प गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.व स्वच्छता सप्ताहाचे उदघाटन करण्यात आले.

## अल्पवयीन मुलाकडून दारू नष्ट करतांना दारूबंदीवाले झोपले होते का ?



बीड (प्रतिनिधी):- पेठ बीड पोलीसांनी विविध कारवाईच्या माध्यमातुन जप्त केलेल्या दारूचा साठा दारूबंदी अधिकाऱ्यांच्या समोर नष्ट करण्यात आला. मात्र दारूबंदी अधिकाऱ्यासमोरच एका अल्पवयीन मुलाला दारूच्या बाटल्या रिकाम्या करायला लावल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे हा सर्व प्रकार पेठ बीड पोलीस ठाण्यात घडला असुन हे सर्व सुरू असतांना दारूबंदीवाले झोपले होते की काय? एकीकडे मुलांना दारूसह इतर व्यसनापासुन दुर ठेवा असे सांगायचे आणि दुसरीकडे मात्र दारू नष्ट करण्यासाठी अल्पवयीन मुलाचा वापर करायचा, ही बाब अतिशय गंभीर आहे.

पेठ बीड पोलीस ठाण्याच्या आवारात दारूबंदी अधिकाऱ्यां च्या देखरेखीखाली पोलीसांनी जात केलेला दारूसाठा नष्ट करण्यात आला. पोलीस आणि दारूबंदी अधिकाऱ्यांसमोर हा दारूसाठा नष्ट केला जात असतांना त्यासाठी एका अल्पवयीन मुलाचा वापर करण्यात आल्याचे समोर आले आहे. पोलीस ठाण्याच्या आवारातच अता प्रकारे कायद्याचा

होत असेल तर यातुन समाजात चुकीचा संदेश जाऊ शकतो, याचे देखील भान दारूबंदी अधिकाऱ्यांना राहिले नाही, याचेच आश्चर्य वाटते. दारू नष्ट करण्याच्या प्रक्रियेत एका अल्पवयीन मुलाचा वापर ही बाब अतिशय गंभीर असुन एक अल्पवयीन मुलगा एका पाठोपाठ एक दारूच्या बाटल्या जमीनीवर ओतुन देत असल्याचे व्हिडीओमध्ये दिसत आहे. सदरील व्हिडीओ देखील सोशल मिडीयात व्हायरल झाला असुन दारूबंदी अधिकाऱ्यांसारख्या जबाबदार अधिकाऱ्यांकडून पोलीसांच्या उपस्थितीत असा प्रकार होत असेल तर या प्रकरणात निश्चितच संबंधितांवर कारवाई होणे आवश्यक असल्याची मागणी होऊ लागली आहे.

## खरं आहे का साहेब ?:कुंभमेळ्याला १४००० कोटी आणि शेतकऱ्यांना २२०० कोटी ? :- शेख युनूस



बीड (प्रतिनिधी) जिल्ह्यातच नव्हे तर पूर्ण राज्यात पावसाने हाहाकार माजवला. व त्यामुळे शेतकऱ्यांचे पिकाचे नुकसान झाले .नुकसान भरपाई म्हणून २२०० कोटी व कुंभमेळ्याला १४००० कोटी हे खरं आहे का साहेब?

सर्वात जास्त मराठवाड्यात अतिवृष्टी मुळे नद्यांना महापूर आला, पिकाचे नुकसान झाले. काही ठिकाणी तर पीक काय माती सुद्धा रानात राहिलेली नाही.काही गाव वाहून गेली, जनावराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले, काही जनावरे दगावली, काही लोकांचे घर उध्वस्त झाले, काहीचे दुकाने उध्वस्त झाली.अशा परिस्थितीत आपण पंचनामा न करता सरसकट मदत द्या. साहेब शेतकरी पहिलेच व्याजाने तसेच मल्टीस्टेट मुळे आत्महत्या करत आहे. आणि आता या संकटामुळे तर जगावे की मरावे असे शेतकऱ्यांना झाले. तरी माझी आदरणीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस तसेच उपमुख्यमंत्री तथा बीड पालकमंत्री अजितदादा पवार यांना समाजसेवक म्हणून माझी आपणास विनंती आहे की , शेतकऱ्याचा सात बारा कोरा करा.व सरसकट मदत जाहीर करा. हीच शेतकऱ्याची ही आपल्याकडून अपेक्षा आहे.

## उपासमारीच्या छायेत मजुरांचे जगणे : पावसाने हिरावला घास ; आता पावसाने उघडीप दिल्याने सोयाबीन काढणीला सुरूवात



लिंबागणेश (प्रतिनिधी):- पावसाने शेतसारा भिजला, शेतकऱ्यांचे नुकसान झाले, पण या पावसाने मजुरांच्या तोंडचा घासच हिरावून घेतला. लिंबागणेश महसूल मंडळात सोयाबीन काढणीसाठी आलेल्या शेकडो मजुरांची पंधरा दिवसांपासून उपासमार सुरू आहे. गुडघाभर पाण्यात सडून पडलेल्या सोयाबीनकडे पाहून शेतकरी हताश तर मजूर हवालदिल झाले. रोजदारी थांबल्याने त्यांच्या घरी धान्याचा दाणा नाही. हिंगणगाव (ता.गेवराई) येथील मजूर दिनेश रावसाहेब जाधव डोळ्यात अश्रू आणून म्हणाले - मुलांच्या पोटात घास नाही. हाताला काम नाही. बाजारहाटासाठी पैसाही नाही. कसं जगायचं? कनाती करून उभ्या केलेल्या तात्पुरत्या झोपड्यांमध्ये पावसाचे पाणी शिरले. ओल्या गाद्यावर लहान मुलं रडत रात्र काढत आहेत. पावसात भिजून अनेक मजूर आजारी पडले. उपचाराचा खर्च परवडत नसल्याने ते वेदना सहन करत आहेत. दरवर्षी शेतकऱ्यांच्या काढणीत खांदे लावणाऱ्या या मजुरांना यंदा पंधरा दिवसांच्या पावसाने अक्षरशः उपाशी ठेवले. आता पाऊस थांबून कामास सुरुवात झाली असली तरी गेलेले दिवस उपासमारीच्या काळोखात गेले, ही वेदना मजुरांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसते.

## वाघो-यात चोरीसत्र थांबेना पोलिसांनी गस्त घालावी

### -सामाजिक कार्यकर्ते अजयसिंह राउत

माजलगाव (प्रतिनिधी):- तालुक्यातील वाघोरा या गावामध्ये मागील अनेक दिवसांपासुन चो-या सुरू असुन आतापर्यंत जवळपास पाच ते सहा लाख रूपयांचा ऐवज चोरट्यांनी लांबविला असुन याप्रकरणी पोलिसांत तक्रार देउन पंचनामे करून देखिल चोरांचा तपास लागत नसल्याने मात्र पोलिसांच्या कामावर संशय व्यक्त करत पोलिसांनी गावात गस्त घालुन चोरट्यांचा शोध लावावा अशी मागणी वाघोरा ग्रामस्थांसह सामाजिक कार्यकर्ते अजयसिंह राउत यांनी केली आहे. तालुक्यातील वाघोरा गावात आतापर्यंत तीन जणांच्या घरी/दुकानांत चोरी झाली आहे. यामध्ये सुधाकर गोरे यांच्या घरी घरफोडी करून एक लाख रूपयांचे सोने व इतर ऐवज चोरट्यांनी पळविला आहे. त्याचबरोबर केशव लोंढे यांच्या मेडिकल दुकानांत, राजेभाउ डाके यांच्या किराणा दुकान फोडुन गल्यातील पैसे चोरले. त्यामुळे ग्रामस्थांनी रात्री गस्त सुरू केली आहे परंतु तरी देखिल चो-यांचे प्रमाण कमी होत नाही. या चो-यांचा पोलिसांनी पंचनामा केला परंतु पुढे काय झाले ? याची मात्र माहिती नाही. त्यामुळे पोलिस प्रशासनाच्या कामावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असुन पोलिस प्रशासनाने चोरट्यांच्या मुसक्या आवळुन चोरीचा तपास लावावा अन्यथा यापुढे चोरटे मोठा दरोडा तसेच गाय, म्हैस, बैल आदी पशुधन देखिल चोरीला जाण्याची शक्यता आहे. परिणामी ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असुन पोलिसांनी या चोरांच्या मुसक्या आवळुन चोरी केलेला तपास लावावा लसेच वाघोरा गावात पेट्रोलिंग करावी अशी मागणी वाघोरा ग्रामस्थांसह सामाजिक कार्यकर्ते अजयसिंह राउत यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे केली आहे.

## बच्चु भाऊ कडू यांच्या शेतकरी कर्जमाफीसह अन्य मागण्यांसाठी अभूतपुर्व सभेला शेतकऱ्यांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे-हनुमंत तोंडे



धारूर (प्रतिनिधी):- राज्यातील शेतकरी,शेतमजूर, कामगार,मेंढपाळ,मच्छीमार,दिव्यांग बांधव यांच्यासाठी आवाज उठवणारे लोकनायक संस्थापक अध्यक्ष माजीमंत्री मा.बच्चु भाऊ कडू यांच्या नेतृत्वात राज्यव्यापी हक्क यात्रा चालु आहे.त्या अंतर्गत एक जाहिर सभा २८ सप्टेंबर रविवार रोजी अबांजोगाई येथे पहिली सभा १० वा. संपन्न होणार आहे.दुसरी लगेचच गरड मंगल कार्यालय किल्ले धारूर येथे दुपारी १२:३० वाजता भव्य शेतकरी कर्जमुक्ती सभा आयोजित करण्यात आली आहे.असुन या हक्क यात्रेच्या जाहीर सभेत बीड जिल्ह्यातील जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आव्हान बीड प्रहार जनशक्ती पक्ष जिल्हा अध्यक्ष विलास भाऊ काळूंके,प्रहार जनशक्ती पक्ष युवक जिल्हा अध्यक्ष अशोक भाऊ सोनवणे,प्रहार जनशक्ती पक्ष जिल्हा सरचिटणीस तथा किल्ले धारूर ता.अध्यक्ष हनुमंत तोंडे यांनी सर्व बांधवाना उपस्थित राहण्याचे आव्हान केले आहे. महिलावर्ग,युवक सर्व उपेक्षित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी या बीड जिल्ह्यातील दोन्ही सभा अत्यंत निर्णायक ठरणार आहेत. म्हणून या दोन्ही सभेला बीड जिल्ह्यातील सर्व नगरीकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन मा.बच्चु भाऊ कडू यांच्या नेतृत्वाला बळ देण्यासाठी या बीड जिल्ह्यातील दोन्हीही सभेला उपस्थित राहवे.

## कर्जाचे ओझे पाठीवर आश्वासनाचा डोंगर डोक्यावर संकटाशी मात्र शेतकरी एकटाच लडतोय मातीवर ग्रा. सदस्य-नय्यूम शेख



सिरसाळा (प्रतिनिधी):- परळी तालुक्यातील पोहनेर तेलसमुख ममदापूर दिग्रस गव्हाणे कवडगाव हिवरा सिरसाळा या गावांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील पोहणेर,डिग्रस,बोरखेड, अशा अनेक गावांमध्ये पाणी शिरले आहे. यामुळे घरांचे, शेतीचे आणि इतर मालमत्तेचे मोठे नुकसान झाले आहे. यामुळे शेतकरी,शेतमजुर हतबल झाले असून शासनाकडून त्यांना मदतीची गरज आहे.या गंभीर परिस्थितीची दखल घेत सामाजिक कार्यकर्ते शेख यांनी सरकारकडे त्वरित मदतीची मागणी केली आहे. पुरामुळे नागरिकांचे जीवन विस्कळीत झाले आहे. त्यांना तातडीने मदतीची उपलब्ध करून दिली पाहिजे, असे शेख म्हणाले. त्यांनी प्रशासनाला पुरामुळे झालेल्या नुकसानीचे सर्वेक्षण लवकरात लवकर सुरू करण्याची विनंती केली, जेणेकरून बाधित कुटुंबांना योग्य ती आर्थिक मदत मिळू शकेल. शेख यांनी स्थानिक प्रशासन आणि स्वयंसेवी संस्थांनाही पूरग्रस्तांच्या मदतीसाठी पुढे येण्याचे आवाहन केले आहे. आपण सर्वांनी मिळून या संकटाचा सामना केला पाहिजे. मदत कार्यासाठी प्रत्येकाने आपापल्या परीने हातभार लावणे महत्त्वाचे आहे, असे त्यांनी सांगितले.

# कलेक्टर साहेब, आपली यंत्रणा कोमलवाडी-भोजगावच्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर येऊन कधी पाहाणी करणार?

**गोरगरीब शेतकऱ्यांच्या संसाराची उद्ध्वस्त झालेली स्थिती प्रशासनाने स्वतःच्या डोळ्यांनी पाहावी?**

**गोरगरिबांचा संसार पुन्हा उभा करण्यासाठी पंचनामे ऐवजी तात्काळ सरसकट मदत जाहीर करा?**

गेवराई (प्रतिनिधी):- तालुक्यातील कोमलवाडी आणि भोजगाव परिसरात गेल्या काही दिवसांपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे संसार उध्वस्त झाले आहेत. पिके वाहून गेली, जमिनी खरडून निघाल्या आणि गोरगरीब शेतकऱ्यांच्या डोळ्यांसमोर आयुष्यभराची कमाई पाण्यात गेली.

विशेष म्हणजे भोजगाव गावाला अक्षरशः महापुराने वेढा घातला होता. या पुराच्या तडाख्यातून शेकडो शेतकरी उद्ध्वस्त झाले आहेत. घरे, जनावरे, शेतातील पिके यांचे प्रचंड नुकसान झाले असून आजही शेतकरी हताश अवस्थेत आहेत. परंतु, या आक्रोशाकडे जिल्हा प्रशासन आणि तालुका प्रशासनाने अजूनही लक्ष दिलेले नाही. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचा प्रश्न उपस्थित होत आहे की, आमच्या बांधावर अधिकारी कधी येणार? आमचं दुःख कोण ऐकणार? गोरगरीब शेतकऱ्यांच्या संसाराची उद्ध्वस्त झालेली स्थिती प्रशासनाने स्वतःच्या डोळ्यांनी पाहावी. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ सर्वे करून मदत द्यावी. शिवाय गोरगरिबांचा संसार पुन्हा उभा करण्यासाठी सरकारने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी शेतकरी करत आहेत. आज गावोगावी संतापाची लाट उसळत असून



कलेक्टर साहेब, आपली यंत्रणा कोमलवाडी-भोजगावला कधी पाठवणार? असा प्रश्न पान २ वर...



# अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे आयुष्य उध्वस्त झाले

## सरकारने केवळ घोषणा न करता तातडीने निर्णय घ्यावा - आ.जयंत पाटील



बीड (प्रतिनिधी)):- मराठवाड्यासह बीड जिल्ह्यात अतिवृष्टी झाल्याने शेतकरी पूर्णपणे उध्वस्त झाला आहे. त्यामुळे सरकारने तातडीने ठोस मदत करावी, अशी मागणी आ.जयंत पाटील यांनी केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष आ.जयंत पाटील हे शुक्रवार (दि.२६) रोजी बीड जिल्ह्यातील अतिवृष्टी झालेल्या भागाचा दौरा करण्यासाठी आले होते. यावेळी पत्रकार परिषद घेऊन त्यांनी शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई देण्याची मागणी केली आहे. यावेळी बोलताना आ.जयंत पाटील म्हणाले की, अतिवृष्टीमुळे शेतकरी पूर्णपणे उध्वस्त झाला आहे. मराठवाड्यात बहुतेक ठिकाणी सामान्य अतिवृष्टी झाली नसून सर्वच गावे पाण्याखाली गेली आहेत. जनावरे वाहून गेली आहेत. काही जनावरे जागेवरच दगावली आहेत.शेळ्या मेंढ्या वाहून गेल्या आहेत. घरामध्ये पाणी शिरल्याने सर्व वस्तू साधने वाहून गेली आहेत. घरे वाहून गेली आहेत. त्यामुळे शासनाने चार पाऊल पुढे येऊन शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करावी. शेतकऱ्यांच्या शिवारात उभे असलेले सोनेरी पीक काही क्षणांत नष्ट झाले. शेतकरी डोळ्यांत अश्रू घेऊन आपला संसार उद्ध्वस्त होताना बघत पान २ वर...

# सरकार आपदग्रस्तांच्या पाठिशी खंबीर उभा आहे

## ना. अजितदादा पवार यांनी व्यक्त केला विश्वास, गेवराईतील पूरग्रस्त गावांना भेट

गेवराई, (प्रतिनिधी) राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांनी गेवराई विधानसभा मतदार संघातील पूरग्रस्त भागांचा दौरा करून आहेरचिंचोली, खामगाव, नांदुरहवेली आणि ईटकुर या गावांना भेटी देऊन आपदग्रस्त शेतकरी व नागरीकांशी संवाद साधला. सरकार आपदग्रस्तांच्या पाठिशी खंबीरपणे उभा आहे असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. दौऱ्यात जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित, आ. विजयसिंह पंडित यांच्यासह अधिकारी व पदाधिकारी



उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांनी गेवराई विधानसभा मतदार संघातील आहेरचिंचोली, खामगाव, नांदुरहवेली आणि ईटकुर या पूरग्रस्त गावांना गुरुवार, दि.२५ सप्टेंबर रोजी भेटी दिल्या. या दौऱ्यात त्यांनी महिलांशी संवाद साधून त्यांच्या वेदना व अडीअडचणी समजवून घेत त्यांचे प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले. अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळे खचून गेलेले रस्ते, नादुरुस्त पुल, खरडून वाहून गेलेल्या शेतजमीनी, बाधित पिके आणि घरांची झालेली पडझड आदींची ना. पवार यांनी पाहणी केली. पूर परिस्थितीला भविष्यात तोंड देताना कायमस्वरुपी उपाययोजना करणे संदर्भात त्यांनी प्रशासनाला निर्देश दिले. अनेक ठिकाणी पूरग्रस्त भागातील पुलांची उंची वाढविण्याचे निर्देश ना. पवार यांनी अधिकाऱ्यांना दिले.

नुकसानग्रस्त शेतजमीनीचे व पिकांचे तात्काळ पंचनामे करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांनी प्रशासनाला पान २ वर...

# धारूर तालुक्यात १० टक्के घरकुलाचे बांधकामेच झाले नाहीत

## घर बांधकाम नाही झाल्याचा पुरावा द्या म्हणत गट विकास अधिकाऱ्याकडून घरकुल विभागातील कर्मचाऱ्यांची पाठ राखण

धारूर (प्रतिनिधी):- धारूर पंचायत समिती अंतर्गत मागील दोन वर्षांमध्ये प्रधानमंत्री घरकुल योजनेअंतर्गत दहा १० हजार लाभार्थ्यांना घरकुल योजने अंतर्गत मंजुरी मिळालेली आहे यातील पूर्ण झालेल्या घरकुलातील केवळ दहा टक्के लोकांनी घरे बांधले आहेत आणि ९० % लाभार्थ्यांनी घराचे बांधकाम करायचे असताना घरकुल विभागातील कर्मचाऱ्यांच्या सांगण्यावरून घराचे बांधकाम केलेले नाही मात्र अशा लाभार्थ्यांच्या





खात्यावर पैसे टाकण्यात आली आहेत या संदर्भात गटविकास अधिकारी यांच्याशी विचारणा केली असता गटविकास अधिकारी म्हणतात लाभार्थ्यांनी घर बांधले नाहीत याचा पुरावा द्या म्हणत घरकुल विभागातील भ्रष्ट कर्मचाऱ्यांना पाठीशी घालण्याचे काम करत आहेत घरकुल योजनेच्या माध्यमातून घरकुल विभागातील इंजिनियर्सने खरोखरच लाभार्थ्याकडून घरे बांधकाम करून घेतली असतील तर गटविकास अधिकारी प्रत्येक गावात जाऊन प्रत्येक लाभार्थ्याच्या घराचा घर बांधकाम केली आहेत का नाही याचा पंचनामा करतील का असा प्रश्न या अनुषंगाने उपस्थित होत आहे. सामान्य नागरिकांची घराचे स्वप्न पान २ वर...

# अतिवृष्टीमुळे शेतकरी आणि गायरान धारकांचे मोठे नुकसान, तातडीने मदतीची मागणी

बीड : गेल्या काही दिवसांपासून झालेल्या अतिवृष्टीमुळे राज्यातील अनेक भागांतील शेती आणि गायरानांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे नुकसान झाल्याने ते



हवालदिल झाले आहेत. यासोबतच, गायरानांचेही मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर, सरकारने तातडीने शेतकरी आणि गायरान धारकांना नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

अनेक जिल्ह्यांमध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे नद्यांना पूर आला, ज्यामुळे शेती आणि गायराने पाण्याखाली गेली. यामुळे सोयाबीन, कापूस, तूर आणि इतर पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी शेतजमिनी खरडून गेल्या आहेत, तर काही ठिकाणी पिके सडली आहेत. तसेच, गायरानांमध्ये पाणी साचल्याने पिकाचे नुकसाने झाले आहे. या परिस्थितीत सरकारने पान २ वर...

# चुकीच्या पध्दतीने नदीवरील बंधाऱ्याची उंची वाढवल्याने नदी काठच्या शेत जमिनींचे नुकसान

## शेतकऱ्यांची तक्रार ; गुत्तेदाराची चौकशी करा

बीड (प्रतिनिधी):- शिरूर कासार तालुक्यातील घाटशीळ पारगाव येथील सब्र्व्हे नं.१६ मध्ये नदीवरील बंधाऱ्याची उंची चुकीच्या पध्दतीने वाढवल्यामुळे व अयोग्य व्यवस्थापनामुळे नदी काठच्या जमिनींचे प्रचंड नुकसान झाले असून तात्काळ स्थळ पंचनामा करून संबंधित कामाची चौकशी करा आणि नुकसान भरपाई द्या अशी मागणी घाटशीळ पारगाव येथील शेतकरी त्रिंबक खेडकर व इतरांनी केली आहे. घाटशीळ पारगाव येथील सर्व्हे नं. १६ मध्ये नदी काठलगत असलेल्या जमिनींचे पावसामुळे प्रचंड नुकसान झाले आहे. दोन वर्षापुर्वी नदीवरील



बंधाऱ्याची उंची वाढवण्याचे काम करण्यात आले होते. परंतू संरक्षक भिंतीची कोणतीही रचना केली गेली नाही. या चुकीमुळे पान २ वर...

# बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातील विद्यार्थ्यांचे यावर्षीचे संपुर्ण शैक्षणिक शुल्क माफ करा -तांगडे

वडवणी (प्रतिनिधी):- बीड जिल्ह्यासह मराठवाड्यात गेल्या आठवडाभरापासून पावसाने सारांश थैमान घातले होते. यामध्ये प्रचंड प्रमाणात आर्थिक नुकसान देखील झाले आहे. हे नुकसान लवकर भरून येणे शक्य नसल्याने आर्थिक संकट देखील कोसळले असल्याने मराठवाड्यातील स्व-बाहेर जिल्ह्यात शिक्षण घेत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे यंदाचे शैक्षणिक शुल्क माफ करावे. या मागणीसह राज्य सरकार मधील सर्व मंत्र्यांसह केंद्र सरकार मधील



राज्यातील मंत्री, आमदार, खासदार, विद्यमान लोकप्रतिनिधीचे तीन महिन्यांचे वेतन कपात करून हा निधी पूरग्रस्त भागात व शेतर्क्याच्या मदतीसाठी वापरावा. अशी मागणी वडवणी येथील पत्रकार भैय्यासाहेब तांगडे यांनी केली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, बीड जिल्ह्यासह मराठवाडा व अन्य जिल्ह्यात देखील पावसाने हहाकार केला आहे. पाऊस झाल्याने शेतकऱ्यांच्या शेती पिकाचे 'होत्याचं नव्हतं' पान २ वर...

# राष्ट्रीय महामार्ग ६१ खेर्डा खुर्द जोड रस्त्याची दुरावस्था नागरिक त्रस्त

## तात्काळ दुरुस्त करावा यासाठी नागरीकांचा उपोषणाचा इशारा

माजलगाव (प्रतिनिधी):- माजलगाव तालुक्यातील शहापूर मजरा येथील जेमा नाईक तांडा येथील नागरिक व शेतकरी बांधव यांच्या उपयोगासाठी असणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग ६१ ते मौजे खेर्डा खुर्द जोड रस्त्याचे खडीकरण दुरुस्ती करण्यासाठीच्या मागणीसाठी जेमा नाईक तांडा सह शहापूर मजरा येथील नागरिकांच्या उपयोगासाठी सदरील रस्ता हा राष्ट्रीय महामार्ग ६१ खेर्डा खुर्द जोड रस्ता क्रमांक २७ रा.मा. २२२ असून हा रस्ता खुप जुना पान २ वर...



# धोंडराई घरकुलवासीयांची घरपट्टी माफ;सरपंच शितल ताई साखरे यांची घोषणा

गेवराई(प्रतिनिधी) गेवराई तालुक्यातील धोंडराई गावासारख्या ग्रामीण भागातील सध्याची बिकट आर्थिक परिस्थिती पाहता कर वसुली करण्यासाठी ही वेळ योग्य नसल्याची भावना आहे . त्यामुळे घरपट्टी संदर्भात राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे नेते अमरसिंहजी पंडित व गेवराईचे लाडके आमदार विजयसिंहजी पंडित यांच्या सूचनेवरून योग्य पातळीवर भूमिका घेत मराठवाड्यात झालेल्या अतिवृष्टी मुळे ग्रामपंचायत कार्यालय धोंडराईने एक निर्णय घेतला आहे , मंजूर झालेले ६५० घरकुलाचे ग्रामपंचायतचा कर म्हणून घरपट्टी आकारण्यात आली होती , ती रक्कम परत देण्याचा निर्णय ग्रामपंचायत कार्यालयाने घेतला असता तो निर्णय स्वागतार्थ असल्याचे दिसून आले आहे.शेतकऱ्यांवर आलेल्या अस्मानी संकटांना लक्षात घेता



एक मदत म्हणून संबधित लाभार्थ्यांनी भरलेले प्रत्येकी २००० हजार रुपये घरपट्टी आणि वसुलीची सध्या स्थितीला कार्यवाही थांबवून ग्रामीण भागातील जनतेला दिलासा मिळवून दिला, असेही कर्तव्यदक्ष सरपंच शितल साखरे यांनी या पत्रात म्हटले आहे.

मराठवाड्यात मुसळधार पाऊस झाल्यामुळे सर्वत्र शेती पिकाचे नुकसान झाला आहे शेतकरी भयंकर संकटात सापडला आहे गेवराई तालुक्यातील गोदावरी, सिंधफना, आणि अमृता नदीच्या काठावर असलेल्या सर्व शेतकऱ्यांचे पान २ वर...

# दलित कुटुंबाला त्यांच्या हक्कांपासून डावलणाऱ्या भुमाफियांवर गुन्हे दाखल करा

## लोकजनशक्ती पार्टी (रा) युवाचे मराठवाडा प्रदेशाध्यक्ष राजेश वाहुळे यांचे निवेदन



अंबाजोगाई (प्रतिनिधी):- मागील काही वर्षांपासून अंबाजोगाई शहर आणि परिसरात भुमाफियांनी धुमाकूळ घातला आहे. असाच एक अवैधरित्या जमीन हडप करून दलित कुटुंबाला त्यांच्या हक्कांपासून डावलण्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याबाबत कठोर कार्यवाही करावी अशी मागणी लोकजनशक्ती पार्टी (रा) युवाचे मराठवाडा प्रदेशाध्यक्ष राजेश वाहुळे यांनी गुरूवारी अप्पर जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

लोकजनशक्ती पार्टी (रा) युवाचे मराठवाडा प्रदेशाध्यक्ष राजेश वाहुळे यांनी गुरूवार, दिनांक २५ सप्टेंबर रोजी अप्पर पान २ वर...

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT